# भविष्यात भारत हीच मोठी शेतमालाची बाजारपेठ : सुभाष काटकर

## नाशिकमध्ये 'स्मार्ट' अंतर्गत राज्यातील पहिले खरेदीदार–विक्रेता संमेलन

**ॲग्रोवन वृत्तसेवा**

नाशिक : परदेशात शेतमालाची निर्यात झाली तरच पैसे मिळतात ही मानसिकता आता बदलून फेरविचार करण्याची गरज आहे. कारण अमेरिका, युरोप असे मोठे देश भारताबरोबर व्यापार करार करण्यास पुढे येत आहे. कारण भविष्यात भारताकडे प्रमुख ग्राहक व बाजारपेठ म्हणून पाहिले जात आहे.याच पार्श्वभूमीवर देशातील मागणी ओळखून शेतमाल उत्पादन घेऊन बाजारपेठ मिळवावी, असे प्रतिपादन नाशिक विभागीय कृषी सहसंचालक सुभाष काटकर यांनी केले.

बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प आणि पॅलेडियम कन्सल्टिंग इंडिया प्रा. लि.च्या संयुक्त विद्यमाने नाशिक विभागीय खरेदीदार विक्रेता संमेलन २०२६ चे आयोजन बुधवार(ता.११) रोजी नाशिक येथील एसएसके हॉटेलमध्ये करण्यात आले होते. यावेळी 'आत्मा'चे प्रकल्प संचालक व स्मार्टचे विभागीय नोडल अधिकारी अभिमन्यू काशीद, 'पॅलेडियम'चे कृषी व्यवसाय व विपणन तज्ज्ञ राम मोहिते, वुमेन्स पॉवर शेतकरी उत्पादक कंपनीच्या अध्यक्षा मथुरा जाधव, खरेदीदार कंपनीचे प्रतिनिधी व प्राईम फ्रेशचे आर. वैद्यनाथन 'स्मार्ट'चे जिल्हा अंमलबजावणी कक्षाचे नोडल अधिकारी विजय पवार आदी मान्यवर उपस्थित होते.

श्री.काटकर म्हणाले, की भारतामध्ये ५० टक्के उत्पादक घटक हा ग्रामीण भागात तर ५० टक्के ग्राहक हा शहरी भागात राहतो. दोन वेगळे भाग आहेत. हे या संमेलनाच्या माध्यमातून जोडले जातील.देशभरातील मागणी ओळखून या आयोजनातून नव्या व्यावसायिक संधी निर्माण होतील. त्यानुसार व्यवसायिक वाटचाल सुरू ठेवून कामकाज करावे, असा आशावाद व्यक्त केला.

स्मार्ट प्रकल्पांतर्गत शेतकरी उत्पादक संस्था एकत्रीकरण, प्राथमिक व दुय्यम प्रक्रिया,गुणवत्ता हमी आणि बाजाराशी प्रभावी संलग्नता साधण्यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने खरेदीदार व विक्रेता यांची जोडणी,व्यवहारकेंद्री बाजार संवाद व्यासपीठ निर्माण करून खरेदीदार व शेतकरी सामूहिक संस्थांमधील ही दरी कमी करण्यासाठी हे आयोजन महत्त्वपूर्ण असल्याचे श्री. काशीद यांनी सांगितले.शेतकरी उत्पादक समूहांना व्यावसायिकदृष्ट्या स्पर्धात्मक बनवण्यासाठी खरेदीदार–विक्रेता संमेलनाचे आयोजन असल्याचे श्री.मोहिते यांनी सांगितले.

कार्यक्रमात खरेदीदार प्रतिनिधी दिनेश लगड, ऋषिकेश दजगुडे यांनी खरेदी निकष व कामकाज पद्धती मांडली. शेतकरी उत्पादक कंपन्यांचे विक्रेता प्रतिनिधी शरद शिंदे, बापू मोरे, भूषण निकम, भारती मोरे यांनी कंपनीची उत्पादनांच्या संबंधित माहिती दिली.

'स्मार्ट' विभागीय कार्यालयाच्या तंत्र अधिकारी मनिषा जाधव यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. मूल्य साखळीतज्ज्ञ चंदन मुळे यांनी उपस्थित खरेदीदार व विक्रेत्यांचा परिचय करून दिला. पॅलेडियम व स्मार्ट कक्षाच्या टीमने कार्यक्रमाचे नियोजन केले.




**नाशिक : विभागीय खरेदीदार विक्रेता संमेलनात मार्गदर्शन करताना विभागीय कृषी सहसंचालक सुभाष काटकर व यावेळी व्यासपीठावर उपस्थित मान्यवर.**

### ४५ शेतकरी उत्पादक कंपन्या व ३० खरेदीदार सहभागी

नाशिक व नंदुरबार जिल्ह्यातील स्मार्ट प्रकल्पांमध्ये सहभागी असलेल्या ४५ शेतकरी उत्पादक कंपन्या व ३० राष्ट्रीय व बहुराष्ट्रीय स्तरावरील संस्थात्मक पातळीवरील खरेदीदार यात सहभागी झाले होते.

Scanned with OKEN Scanner



Scanned with OKEN Scanner



Scanned with OKEN Scanner




Scanned with OKEN Scanner



Scanned with OKEN Scanner




Scanned with OKEN Scanner